# <u>ईतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र ४०२/२०२४ मधील नि. क्र.१ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज तपासी अंमलदार यांनी दोषारोपपत्र दाखल करण्यास झालेला ४२ दिवसांचा विलंब माफ होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. तपासी अंमलदार यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत गुन्हयाचे पुर्वीचे तपासी अंमलदार सेवा निवृत्त झाल्याने त्यांच्याकडे दि.१५/०३/२०२४ रोजी प्रस्तुत गुन्हयाचे तपासकाम सोपविण्यात आले. त्यामुळे प्रस्तुत दोषारोपपत्र दाखल करण्यास ४२ दिवसांचा विलंब झालेला आहे.

०२. आरोपीतर्फे नि.२ कडे म्हणणे दाखल करुन असे कथन करण्यात आले की, अर्जामध्ये विलंबाचे योग्य व संयुक्तीक कारण नमूद नाही. विलंब हा जाणिवपुर्वक केलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४७३ अन्वये मुदत मर्यादा संपल्यानंतर एखाद्या अपराधाची दखल घ्यावयाची झाल्यास, विलंबाचे योग्यप्रकारे स्पष्टीकरण देण्यात आले किंवा न्यायहितार्थ तशी दखल घेणे जरुरीचे आहे याबाबत न्यायालयाचे समाधान झाले तर सदर न्यायालयास अपराधाची दखल घेता येईल. प्रस्तुत अर्जातील कथने पाहता, मी या मताचा आहे की, दोषारोपपत्र दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे समधानकारक स्पष्टीकरण तपासी अंमलदार यांनी दिलेले आहे. त्याचप्रमाणे, प्रस्तुतचा अपराध हा मानवी शरीरास व जिवीतास बाधक होणारा अपराध आहे. त्यामुळे सदर अपराधाची दखल घेणे न्यायहितार्थ जरुरीचे आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यायोग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेशः–

## <u>आदेश</u>

०१. अर्ज निशाणी १ मंजूर करण्यात येतो व दोषारोपपत्र दाखल करण्यास झालेला ४२ दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो.
०२. प्रस्तुतचे प्रकरण नियमित फौजदारी खटला या सदरी नोंदविण्यात यावे व प्रकरणाची तारीख **दि.३०/०८/२०२५** ठेवण्यात यावी.
०३ प्रस्तुत अर्ज निकाली करण्यात येतो.

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT Date: 2025.07.04 12:46:17 +0530

ठिकाणः– इंदापूर.
दि.०३/०७/२०२५

(प्र.चं बारटक्के )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर
ता. इंदापूर जि.पुणे.